**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेपाळच्या अंतरिम सरकारच्या पंतप्रधान सुशीला कार्की यांच्याशी साधला संवाद (18 सप्टेंबर 2025)**

18 सप्टेंबर 2025

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज नेपाळच्या अंतरिम सरकारच्या पंतप्रधान सन्माननीय श्रीमती सुशीला कार्की यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला.

2. पंतप्रधान कार्की यांच्या नियुक्तीबद्दल पंतप्रधानांनी त्यांचे अभिनंदन केले आणि भारत सरकार आणि जनतेच्या वतीने त्यांना शुभेच्छा दिल्या.

3. नेपाळमधील अलीकडील निदर्शनांमध्ये झालेल्या दुःखद जीवितहानीबद्दल पंतप्रधानांनी शोकभावना व्यक्त केल्या.

4. उभय देशांमध्ये असलेले विशेष संबंध वृद्धिंगत करण्यासाठी जवळून काम करत राहण्याची भारताची तयारी असल्याचे पंतप्रधानांनी सांगितले. तसेच नेपाळ मधील जनतेच्या प्रगतीसाठी शांतता आणि स्थैर्य पुनर्स्थापित करण्याच्या नेपाळच्या प्रयत्नांना भारताचा पूर्ण पाठिंबा असेल असे ते म्हणाले.

5. नेपाळला दर्शवलेल्या भक्कम पाठिंब्याबद्दल नेपाळच्या पंतप्रधान सुशीला कार्की यांनी पंतप्रधानांचे आभार मानले आणि दोन्ही देशांमधील संबंध अधिक दृढ करण्याच्या पंतप्रधानांच्या इच्छेला दुजोरा दिला.

6. पंतप्रधानांनी नेपाळच्या आगामी राष्ट्रीय दिनानिमित्त देखील शुभेच्छा दिल्या.

7. नेत्यांनी एकमेकांच्या संपर्कात राहण्यावर सहमती दर्शविली.

नवी दिल्ली

18 सप्टेंबर 2025